Article Date	Headline / Summary	Publication
12 Oct 2026	Room Rent, Co-Payment and Deductibles	Kesari (Marathi)

रूम रेंट, को-पेमेंट आणि डिडक्टिबल्स

तुमच्या अंतिम वैद्यकीय बिलावर परिणाम करणारे आरोग्य विम्यातील खर्च

आरोग्य विमा हा कठीण प्रसंगी आर्थिक संरक्षण देण्यासाठी आणि आर्थिक ताण न घेता आवश्यक वैद्यकीय उपचार मिळवून देण्यासाठी महत्त्वाचा ठरतो. आपल्या आरोग्य विमा योजनेचा पुरेपूर लाभ घेण्यासाठी रूम रेंट लिमिट, को-पेमेंट आणि डिडक्टिबल्स यांसारख्या महत्त्वाच्या संज्ञा समजून घेणे आवश्यक आहे. या अटींबाबत अनेकदा संभ्रम असतो; मात्र, विम्याच्या दाव्यापोटी स्वतःच्या खिशातून किती पैसे खर्च करावे लागतील, हे ठरवण्यात त्यांची महत्त्वाची भूमिका असते.

भारतात आरोग्यावरील खिशातून कराव्या लागणाऱ्या खर्चाचे प्रमाण अलीकडील वर्षांत मोठ्या प्रमाणात घटले असले, तरी विमा पॉलिसीतील अटींचा दावा मंजुरीवर कसा परिणाम होतो, याची माहिती नसल्यामुळे अनेक कुटुंबांना आजही अनपेक्षित खर्चाचा सामना करावा लागतो. या अटी समजून घेतल्यास उपचारांदरम्यान होणारा अतिरिक्त खर्च टाळता येऊ शकतो आणि आपल्या गरजांना अनुरूप विमा संरक्षण निवडणे शक्य होते. आरोग्य विमा निवडण्यापूर्वी या खर्चांकडे लक्ष द्या. आरोग्य विमा पॉलिसी घेताना खालील बाबी तपासणे आवश्यक आहे.

१. रूम रेंट लिमिट
(खोलीच्या भाड्याची मर्यादा)

रूम रेंट लिमिट म्हणजे रुग्णालयात दाखल असताना खोलीच्या भाड्यासाठी आरोग्य विमा कंपनीकडून दररोज दिल्या जाणाऱ्या रकमेची कमाल मर्यादा. पॉलिसीत नमूद केलेल्या मर्यादेपेक्षा जास्त भाडे असलेली खोली निवडल्यास, खोलीच्या भाड्यातील फरक स्वतःला भरावा लागू शकतो. याशिवाय, डॉक्टरांचे शुल्क, नर्सिंग चार्जेस, आयसीयूशी संबंधित शुल्क, शस्त्रक्रियेचा खर्च आणि इतर काही वैद्यकीय खर्चांवरही प्रमाणानुसार कपात होऊ शकते.

उदाहरणार्थ, तुमच्या ₹१० लाखांच्या आरोग्य विमा पॉलिसीत खोलीच्या भाड्यासाठी दररोज ₹५,००० ची मर्यादा आहे. मात्र, रुग्णालयात दाखल झाल्यानंतर तुम्ही दररोज ₹१०,००० भाडे असलेली खोली निवडली, तर तुम्ही पॉलिसीतील मर्यादेपेक्षा दुप्पट भाड्याची खोली घेतली आहे.

अशा परिस्थितीत विमा कंपनी केवळ खोलीच्या भाड्यापुरतीच कपात करत नाही, तर खोलीच्या श्रेणीशी संबंधित डॉक्टरांचे शुल्क, नर्सिंग चार्जेस



डॉ. विकास गुप्ता
प्रमुख - हेल्थ ॲडमिनिस्ट्रेशन टीम, बजाज जनरल इन्शुरन्स लिमिटेड

आणि शस्त्रक्रियेचा खर्च यांसारख्या इतर खर्चांवरही प्रमाणानुसार कपात करू शकते.

त्यामुळे तुमचे एकूण रुग्णालयाचे बिल ₹२ लाख ६० हजार असूनही आणि ते विम्याच्या एकूण संरक्षित रकमेच्या मर्यादेत असले, तरी विमा कंपनी अंदाजे ₹१ लाख ३० हजार इतकीच रक्कम मंजूर करू शकते. परिणामी, उर्वरित रक्कम तुम्हाला स्वतःच्या खिशातून भरावी लागू शकते. म्हणूनच, रूम रेंट लिमिटचा विमा दाव्याच्या मंजूर होणाऱ्या रकमेवर अपेक्षेपेक्षा अधिक परिणाम होऊ शकतो, हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे.

२. को-पेमेंट (दाव्यातील खर्चातील सहभाग)

को-पेमेंट म्हणजे विम्याचा दावा करताना एकूण पात्र दाव्याच्या ठरावीक टक्केवारीची रक्कम स्वतः भरण्याची पॉलिसीधारकावर असलेली अट. उर्वरित रक्कम विमा कंपनी भरते. ही अट पॉलिसीच्या नियमांमध्ये नमूद केलेली असते आणि दावा मंजूर झाल्यानंतर प्रत्यक्ष मिळणाऱ्या रकमेवर तिचा परिणाम होतो.

त्यामुळे पॉलिसीमध्ये किती टक्के को-पेमेंट लागू आहे, हे समजून घेणे आवश्यक आहे. कारण या अटीमुळे उपचारांसाठी स्वतःला करावा लागणारा खर्च वाढू शकतो.

उदाहरणार्थ, तुमच्या विमा पॉलिसीत २० टक्के को-पेमेंटची अट आहे आणि रुग्णालयाचे बिल ₹१ लाख आहे. अशा वेळी तुम्हाला ₹२० हजार स्वतः भरावे लागतील, तर उर्वरित ₹८० हजार विमा कंपनी भरेल.

तुम्ही कितीही वेळा विम्याचा दावा केला, तरी प्रत्येक वेळी संबंधित अटींनुसार को-पेमेंट लागू होऊ शकते. त्यामुळे को-पेमेंटची अट असलेल्या पॉलिसींचा प्रीमियम तुलनेने कमी असू शकतो; मात्र, वैद्यकीय आणीबाणीच्या वेळी स्वतःच्या खिशातून करावा लागणारा खर्च वाढू शकतो.

३. डिडक्टिबल
(स्वतः भरावयाची प्रारंभिक रक्कम)

डिडक्टिबल म्हणजे विमा कंपनीने दाव्याची रक्कम देण्यास सुरुवात करण्यापूर्वी पॉलिसीधारकाने स्वतः भरावयाची ठरावीक रक्कम. काही विमा पॉलिसींमध्ये अनिवार्य डिडक्टिबल असते. त्यामुळे पॉलिसीचे नियम आणि अटी काळजीपूर्वक वाचणे आवश्यक आहे. काही वेळा प्रीमियम कमी करण्यासाठी ग्राहक स्वेच्छेने अधिक डिडक्टिबलची निवड करतात.

उदाहरणार्थ, तुमच्या आरोग्य विमा पॉलिसीत ₹५० हजार डिडक्टिबल आहे आणि रुग्णालयाचे बिल ₹२ लाख आहे. अशा परिस्थितीत सुरुवातीचे ₹५० हजार तुम्हाला स्वतः भरावे लागतील किंवा अन्य मूलभूत आरोग्य विमा पॉलिसीतून त्याची तरतूद करावी लागेल. त्यानंतर उर्वरित ₹१ लाख ५० हजारांची रक्कम विमा कंपनीकडून दिली जाऊ शकते.

मात्र, तुमचे रुग्णालयाचे बिल केवळ ₹४० हजार असेल, तर ते डिडक्टिबलच्या रकमेपेक्षा कमी असल्यामुळे या पॉलिसीतून कोणतीही रक्कम मिळणार नाही.

अतिरिक्त संरक्षणासाठी ॲड-ऑन्स आणि रायडर्सचा पर्याय

रूम रेंट लिमिट, को-पेमेंट आणि डिडक्टिबल्स यांसारख्या मर्यादांचा आर्थिक परिणाम कमी करण्यासाठी विमा कंपनी आणि पॉलिसीच्या अटींनुसार योग्य ॲड-ऑन्स किंवा रायडर्स निवडता येतात. या अतिरिक्त सुविधांमुळे विमा संरक्षणाची व्याप्ती वाढू शकते आणि दावा करताना स्वतःच्या खिशातून करावा लागणारा खर्च कमी होण्यास मदत होऊ शकते. मात्र, अतिरिक्त संरक्षण आणि अधिक सुविधा मिळवण्यासाठी सामान्यतः जास्त प्रीमियम भरावा लागू शकतो. अनेक पॉलिसीधारक विम्याची मोठी संरक्षित रक्कम निवडण्यावर भर देतात; मात्र, पॉलिसीतील वरील अटींकडे दुर्लक्ष करतात. त्यामुळे आपल्याला संपूर्ण वैद्यकीय खर्चाचे संरक्षण मिळेल, असा त्यांचा समज असतो. प्रत्यक्षात दावा करताना मात्र बिलातील काही रक्कम स्वतः भरावी लागल्याचे त्यांच्या लक्षात येते.

विमा प्रीमियम महाग असल्याच्या समजुतीमुळे अनेक जण अतिरिक्त संरक्षण घेण्यास टाळाटाळ करतात. मात्र, आज विमा कंपन्या विविध नवीन सुविधा आणि रायडर्स उपलब्ध करून देत आहेत. पॉलिसीच्या अटींनुसार त्यांचा योग्य वापर केल्यास आरोग्य विम्यातील काही खर्चमर्यादांचा परिणाम कमी करणे शक्य होऊ शकते. ■■